**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## आचार्य पदवी नोंदणीबाबत एम.फिल धारक व कोर्सवर्क परीक्षा २०२१ उत्तीर्ण संशोधनकर्त्यांना सूचना आवेदनपत्र भरण्यास १३ ते २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने आचार्य पदवीकरीता प्रवेशित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२०-२१ एम.फिल धारक व कोर्सवर्क परीक्षा २०२१ उत्तीर्ण झालेल्या संशोधनकर्त्यांना आचार्य पदवी नोंदणी आवेदनपत्रे यापूर्वी १ ते १० जानेवारी, २०२२ दरम्यान भरावयाचे होते. परंतू, विद्यार्थ्यांच्या हितार्थ सदर आवेदनपत्राची तारीख विद्यापीठाच्यावतीने वाढविण्यात आली असून आता संशोधनकर्त्यांना आचार्य पदवी नोंदणी आवेदनपत्र दि. १३ ते २५ जानेवारी, २०२२ या दरम्यान भरता येतील.

तरी सर्व संबंधित आचार्य पदवी कोर्सवर्क उत्तीर्ण संशोधनकर्त्यांनी (एम.फिल धारकासह) नोंद घ्यावी व आपले आवेदनपत्र विहित मुदतीत सादर करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे. परीक्षा विभागाने नुकतेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधनकर्त्यांच्या प्राचार्यांना व संशोधन प्रमुखांना पत्र पाठवून माहिती कळविली असून संशोधन केंद्राबाबतच्या सूचना सुद्धा या पत्रात सविस्तरपणे दिलेल्या आहेत. तरी याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. १४/०१/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी